आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१६ जून २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जम्मू-काश्मीरमधून दहशतवादाचा संपूर्ण बीमोड करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची केंद्रीय गृहमंत्र्यांची ग्वाही
- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीमधे राष्ट्रवादी काँग्रेस ८५ ते ९० जागा मागणार, तर योग्य जागा दिल्या नाहीत तर ३० जागांवर निवडणूक लढवण्याची पीपल्स रिपब्लिकन पक्षाची भूमिका
- बिहार, झारखंड, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि उत्तराखंडमधल्या तुरळक भागात पुढचे दोन दिवस उष्णतेच्या तीव्र लाटेचा अंदाज

  **आणि**
- महिला क्रिकेटमधे, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा १४३ धावांनी विजय /स्मृती मंधानाचं शतक

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमधून दहशतवादाचा संपूर्ण बीमोड करण्यासाठी दहशतवाद्यांविरुद्ध कठोर कारवाईसाठी सरकार कटिबद्ध आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. जम्मू आणि काश्मीरमधल्या सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. आगामी अमरनाथ यात्रेच्या तयारीचा आढावाही त्यांनी घेतला.

जम्मू-काश्मीरमधला दहशतवादाविरुद्धचा लढा निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. दहशतवाद आता नियंत्रणात असून संघटित हिंसक दहशती कृत्यांऐवजी छुप्या संघर्षाचं रूप त्याला प्राप्त झालं असल्याचं शहा म्हणाले. सरकारच्या प्रयत्नांमुळे काश्मीर खोऱ्यातल्या दहशतवादी घटनांच्या संख्येत लक्षणीयरीत्या घट

झाली आहे. कायदा आणि सुव्यवस्थेत सुधारणा झाली असून मोठ्या संख्येनं पर्यटक येत आहेत. तसंच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतदान झाल्याचंही शहा यांनी नमूद केलं.

काश्मीर खोऱ्यात दहशतवादाविरोधात ज्याप्रमाणे कठोर कारवाईची योजना राबवण्यात आली, तशीच योजना जम्मूतही राबवण्याचे निर्देश शहा यांनी या बैठकीत दिले. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय गृह सचिव अजय भल्ला, गुप्तचर विभागाचे संचालक, लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे, नवनियुक्त लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी, या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत ८५ ते ९० जागा लढवण्याचा इरादा राष्ट्रवादी काँग्रेसनं व्यक्त केला आहे. महायुतीमधे तेवढ्या जागा पक्ष मागणार असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल पटेल यांनी आज गोंदिया इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. लोकसभा निवडणुकीत NDA ला अपेक्षित यश मिळालं नसलं तरी विधानसभा निवडणुकीत चित्र बदलेल असं ते म्हणाले.

राज्यात लवकरच महाराष्ट्रात मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याचं पटेल यांनी सांगितलं. केंद्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला मंत्रीपद आलं तर ते मलाच मिळेल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत महायुतीनं योग्य जागा दिल्या नाहीत तर आपण राज्यात ३० जागांवर निवडणूक लढणार असल्याचं पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे यांनी स्पष्ट केलं आहे. ते ठाण्यात बातमीदाराशी बोलत होते.

राज्य मंत्रिमंडळात एक कॅबिनेट, एक राज्यमंत्री आणि एका महामंडळात पक्षाला प्रतिनिधित्व द्यावं, अशी मागणीही कवाडे यांनी केली आहे. केंद्रातल्या रालोआ सरकारनं कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी काम करावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

ईव्हीएम, अर्थात ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र अनलॉक करण्यासाठी ओटीपीची गरज लागत नाही, ते कशाशीही जोडलेलं नसतं, असं वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी स्पष्ट केलं आहे. या मतदारसंघातल्या मतमोजणीवेळी ईव्हीएम अनलॉक करण्यासाठी लागणारा मोबाईल शिवसेनेचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या नातलगाकडे असल्याची चर्चा सुरू होती, त्या पार्श्वभूमीवर त्या आज वार्ताहर परिषदेत बोलत होत्या.

जो मोबाईल वापरला गेला तो इनकोर सिस्टीमशी निगडीत होता. त्याचा मतमोजणीशी संबंध नसून डेटा एन्ट्रीशी संबंध असल्याचं सूर्यवंशी यांनी सांगितलं. या मोबाईलच्या वापराप्रकरणी एफआयआर दाखल केला असून तपास सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

१८व्या 'मिफ' अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आजचा दुसरा दिवस भरगच्च कार्यक्रम आणि उपक्रमांसह पार पडला. माहितीपट क्षेत्रातल्या नवोदितांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने यावर्षी पहिल्यांदाच आयोजित केलेल्या 'माहितीपट बझार'चं उद्घाटन 'दिल्ली क्राइम' या गाजलेल्या वेबसीरिजच्या निर्मात्या अपूर्वा बक्षी यांच्या हस्ते, महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार आणि पत्रसूचना कार्यालयाच्या अतिरिक्त महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांच्या उपस्थितीत झालं. विविध देशांचे, भाषांचे आणि विषयांवरचे माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपट

दाखवण्यात आले. 'माय मर्क्युरी' या माहितीपटाचं आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आज 'मिफ'मध्ये झालं. तत्पूर्वी माहितीपटाच्या दिग्दर्शक ज्युएल चिसेलेट आणि लॉयड रॉस यांनी वार्ताहरांशी संवाद साधला आणि या माहितीपटाच्या निर्मितीचा प्रवास उलगडून दाखवला. चित्रपटांशिवाय, माहितीपटांचं अर्थकारण, आशयनिर्मिती, ॲनिमेशन अशा विविध विषयांवरची माहिती आणि मार्गदर्शनपर चर्चासत्रंही झाली. 'पोचर' या वेबसीरिजचे दिग्दर्शक रिची मेहता यांनी 'पोचरच्या अनुषंगाने गुन्हेगारी थरारपटाचे निर्मितीबंध' या विषयावर प्रेक्षकांशी संवाद साधला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या १११व्या भागात येत्या ३० तारखेला देशवासियांशी संवाद साधणार आहेत. सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मोदी यांचा ‘मन की बात’चा हा पहिलाच कार्यक्रम आहे.

या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपले विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा मायगव्ह खुल्या मंचावर येत्या २८ जूनपर्यंत कळवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

बिहार, झारखंड, ईशान्य मध्य प्रदेश, उत्तर छत्तीसगड आणि उत्तराखंडमधल्या तुरळक भागात पुढील दोन दिवसांत उष्णतेच्या तीव्र लाटेचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीच्या बहुतांश भागातही हीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश, जम्मू आणि उत्तर राजस्थानच्या काही भागात मंगळवारपर्यंत उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता आहे, असंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

पंजाबमधल्या गुरुदासपूर इथं काल, सर्वाधिक कमाल तापमान ४६ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस इतकं नोंदवले गेले.

दरम्यान जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंडीगढ, दिल्ली आणि उत्तर प्रदेशमध्ये येत्या १९ ते २१ जून दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

सिक्कीमच्या पूरग्रस्त भागात बचाव आणि मदतकार्य सुरु आहे. पुराने या राज्यात आतापर्यंत नऊ बळी घेतले आहेत. पुरात दगावलेल्यांच्या जवळच्या नातेवाईकांना चार लाख रुपयांची मदत जाहीर झाली आहे. पुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या मंगन या जिल्ह्यात अडकून पडलेल्या दोन हजार पर्यटकांना आज एअरलिफ्ट करुन सोडवण्यात आलं. यामध्ये १५ परदेशी नागरिकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे बंगळुरु इथं झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेवर १४३ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं स्मृती मंधानाच्या शतकी खेळीच्या जोरावर निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून २६५ धावा केल्या. विजयासाठी २६६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ ३८ व्या षटकातच १२२ धावात गारद झाला. आशा सोभनानं ४ बळी मिळवले.

स्मृतीनं ११७ धावा करताना आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांमधे ७ हजार धावांचा टप्पा ओलांडला. दिप्ती शर्मानं ३७, तर पूजा वस्त्राकारनं नाबाद ३१ धावांचं

योगदान दिलं. दक्षिण आफ्रिकेतर्फे आयाबोंगा खाका हीनं ३, तर सबता कलसनं २ बळी मिळवले.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज फ्लोरिडामधे आयर्लंड आणि पाकिस्तान यांचा सामना सुरु आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला, आणि पहिल्याच षटकात आयर्लंडचा सलामीवीर अँड्रु बल्बिर्नी याचा शून्यावर बळी घेतला.

त्याआधी झालेल्या आजच्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं स्कॉटलंडवर पाच गडी राखून विजय मिळवला.

**<><><><><>**